



# ौनी सेवकराम



गोपाळराव

ग्रं. सं. ठाणें
बालवाङ्मय
क्र. ८३८

खूप वाचा
खूप शिका

...१...

# मौजी सेवकराम

गोपाळराव कुलकर्णी

केशव भिकाजी
श्रीसमर्थ-सद
गिरगांव, मुंब

BVBK-0404596

मूल्य आठ आणे

चित्रकार
वि. ना. गोलिवडेकर

ब्लॉक्स
कर्नाटक प्रोसेस स्टूडिओ

पहिली आवृत्ति : १९५४

मुद्रक
बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक
के. भि. ढवळे
कर्नाटक हाउस
चिराबाजार, मुंबई २

सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

# आला काय

# नि गेला काय !

धरणगांव एक खेडें.

तुम्ही आम्ही नेहमीं पाहातों तसलेंच.

रस्त्यांवर, विहिरींवर, घरांत, दारांत सगळीकडे नुसती घाण.

डोळ्यांना, नाकाला, कानांना शिक्षाच.

पण एक दिवस भाग्याचा उगवला.

सकाळींच एक विलक्षण मनुष्य त्या गांवांत आला.

त्यानें नुसतें पाहिलें

आणि मुकाट्यानें कामाला लागला.

त्याचें काम ...

नुसतें काम नव्हे, मोठी कामगिरी.

आणि तीही गांवांत आनंद, प्रेम, टापटीप ह्यांचा

मधुर सुगंध पसरविणारी.

तसा सुगंध भारतांतल्या प्रत्येक गांवांत कधीं दरवळेल बरें ?

गोपाळराव कुलकर्णी

सेवेचा

# अनुक्रम


१. धरणगांवच्या धर्मशाळेंत ५

२. निःस्वार्थ सेवा ९

३. सहकारी पतपेढी १२

४. होळीचा उत्सव १७

५. तुळसीची करुणकथा २२

६. पतपेढीची प्रगति २६

७. श्रमयज्ञाचें सामर्थ्य ३२

८. ग्रामरक्षक दल ३७

९. तुळसीचें प्रत्यागमन ४१

१०. धरणगांवचा निरोप ४५

अनुक्रमांक
विभाग
क्रमांक
नोंद

# धरणगांवच्या धर्मशाळेंत



हां हां म्हणतां गांवांत बातमी पसरली कीं धर्मशाळेंत कोणीतरी विचित्र मनुष्य आला आहे. लोकांना तो विचित्र वाटला, कारण कीं त्याचें सारेंच विचित्र होतें. तो केव्हां आला तें कोणालाच कळलें नाहीं. बहुतेक तो रात्रीं आला असावा. रात्रीं गुपचुप येऊन तो धर्मशाळेंत झोपला असावा. तो आला हें लोकांना दुसऱ्या दिवशीं सकाळीं कळलें आणि तें फार चमत्कारिक रीतीनें कळलें. सकाळीं सहा वाजतां गांवच्या बाया विहिरीवर पाणी भरायला गेल्या तेव्हां तेथें त्यांना तो दिसला. त्यानें फक्त खादीची एक पांढरी चड्डी घातली होती. हातांत खराटा घेऊन तो विहिरीच्या आसपासची जागा साफ करीत होता. त्याच्या जवळच एक फावडें आणि बारडी पडली होती. खराट्यानें केरकचरा जमा करून




फावड्यानें उचलून तो बारडींत टाकीत होता. बारडी भरली कीं उचलून दूर एका खड्डयांत तो टाकून येई आणि पुन्हा झाडूनें सफाई करी.

त्याला पाहून पाणी भरायला आलेल्या बायांना आश्चर्य वाटलें. पाणी भरायचें सोडून त्या त्याच्याकडे पाहात राहिल्या. त्या आपापसांत त्याच्याबद्दल चर्चा करूं लागल्या. पण त्याचें कोणाकडेच लक्ष नव्हतें. तो आपला खालीं पाहून झाडू मारीत होता. अर्धापाऊण तास झाला पण त्यानें एकदा सुद्धा नजर वर करून कोणाकडे पाहिलें नाहीं. तो कोणाशीं एक शब्द सुद्धा बोलत नव्हता.

तो अगदींच परका होता म्हणून बाया माणसांना त्याची विचारपूस करायचें धाडस झालें नाहीं. त्या पाणी भरून आपापल्या घरीं परत गेल्या. पण त्यांनीं स्वतःच्या आळींतल्या सर्व लोकांना त्या विचित्र माणसाविषयीं सांगितलें आणि अशा रीतीनें हां हां म्हणतां त्या माणसाची बातमी साऱ्या गांवांत पसरली. पाहातां पाहातां गांवांतलीं मुलें आणि पुरुष मंडळी विहिरीवर आलीं. तेथें चांगलीच गर्दी झाली. जणूं काय जंगलांतला कोणीतरी विचित्र प्राणी गांवांत आला आहे, असें त्या सर्वांना वाटत असावें !

विहिरीवर जमा झालेल्या ह्या मंडळींत धरणगांवचे काशीनाथ पाटीलही होते. पाटील गांवांतले मुख्य, म्हणून ह्या नव्या माणसाची विचारपूस केलीच पाहिजे असें त्यांना वाटलें. गर्दींतून पुढें होऊन ते त्या माणसाजवळ गेले आणि त्यांनीं त्याला विचारलें, " काय हो ? तुम्ही कोण ? इथें केव्हां आलां ? आणि हें काय करीत आहां ? "



पाटलांनीं हे प्रश्न विचारले तेव्हां त्या माणसानें हातांतलें काम बंद करून वर पाहिलें आणि हात जोडून पाटलांना नमस्कार केला. पण तो बोलला मात्र कांहींच नाहीं. पाटलांनीं त्याला परत नमस्कार केला आणि विचारलें, " तुम्ही कोण ? कुठून आलां ? "


पण ह्यावर उत्तर न देतां तो एकदा हसला मात्र आणि ओठाला बोट लावून हाताच्या खुणेनें त्यानें आपण बोलूं शकत नाहीं असें कळविलें. पाटलांनीं पुन्हा विचारलें, " तुम्ही बोलत कां नाहीं ? मुके आहांत काय ? "

हें ऐकून तो विचित्र मनुष्य पुन्हा एकवार हसला आणि पुन्हा हाताच्या खुणेनें त्यानें दर्शविलें कीं तो मुका नव्हता, पण मुद्दामच बोलत नव्हता. त्यानें हाताचीं बारा बोटें दाखवून तोंडावर बोट ठेवलें आणि मान हलवून बोलणार नाहीं असें दर्शविलें.

तो बोलतच नसल्यामुळें त्याच्याशीं जास्त बोलण्यांत कांहींच अर्थ नाहीं असें वाटून पाटील जमा झालेल्या लोकांना म्हणाले, " चला आतां आपापल्या घरीं. हा माणूस कुणीतरी विचित्र दिसतोय्. बारा वाजेपर्यंत तो कांहींच बोलणार नाहीं. बारा वाजल्यावर विचारूं त्याला सारं आपण." पाटलांनीं असें म्हटल्यावर हळूहळू लोक पांगूं लागले. पाटीलही परतण्याच्या विचारांत होते, इतक्यांत एक पोरगा धावत धावत त्यांच्याजवळ आला आणि म्हणाला, " काका, ह्या माणसाचं सामान धर्मशाळेंत पडलंय्. मीं आतांच पाहिलं."

ह्यावर पाटील पुन्हा त्या माणसाकडे वळले आणि त्यांनीं त्याला विचारलें, " धर्मशाळेंत मुक्काम केलाय् तुम्हीं ? " त्यानें मानेनें होय म्हटलें. " मग राहाणार इथेंच कांहीं दिवस ? " ह्याचेंही उत्तर मानेनेंच " होय " असें मिळालें. ह्यावर पाटील म्हणाले, " पण तुमच्या जेवणाखाणाचं काय ? "

त्या विचित्र माणसानें वर तोंड करून आकाशाकडे बोट केलं आणि तो हसला. पाटील समजले कीं माझ्या पोटापाण्याची चिंता देवाला, असें त्या माणसाला म्हणायचें होतें. नंतर पाटील त्या धावत आलेल्या मुलाला म्हणाले, " किशा, घरीं जाऊन तुळशीला सांग कीं ह्या माणसासाठीं धर्मशाळेंत थोडं जेवण घेऊन जा." हें ऐकून किशा धावतच घरीं गेला आणि नंतर पाटील आणि इतर माणसेंही हळुहळू आपल्या घरीं निघून गेलीं.



## निःस्वार्थ सेवा

## २.

धर्मशाळेंतला तो नवा मनुष्य पंधरा दिवसांतच अगदीं गांवचाच असल्याइतका जुना होऊन गेला. सगळा दिवस तो गांवाची कांहीं ना कांहीं सेवा करण्यांत घालवी. सकाळीं गांवांतल्या कोठल्या तरी भागाची सफाई तो करी. दुपारीं बारा वाजतां मौन सोडल्यानंतर तो धर्मशाळेंत बसून राही, त्या वेळांत गांवांतले निरनिराळे लोक त्याच्याशीं गप्पा मारायला येत. ह्या गप्पांतून गांवच्या लोकांना पुष्कळच नव्या गोष्टी जाणायला मिळत. लोकही स्वतःच्या घराविषयींचे किंवा गांवाविषयींचे अनेक प्रश्न त्याच्यापुढें मांडीत आणि तोही अगदीं मोकळेपणानें त्यांना योग्य सल्ला देई.

संध्याकाळीं ५ वाजतां तो गांवच्या वेशीबाहेरच्या वडाखालीं जाऊन बसे. त्या वडाच्या उंच पारावर एका

कोपऱ्यावर घोंगडी टाकून तो बसे. थोड्याच वेळांत गांवच्या शाळेचीं मुलें त्याच्या आसपास जवळ जवळ चाळीस पन्नास मुलें तरी तेथें येत. त्या सर्व मुलांना तो निरनिराळ्या प्रकारचे खेळ खेळवी. त्यांना तो खूप मजेच्या गोष्टीही सांगे. त्यांना चांगलीं चांगलीं भजनें म्हणावयाला शिकवी. त्यांना लष्करी पद्धतीचें ड्रिलही शिकवी. इतकेंच नव्हे, तर त्यांना तो स्वच्छतेचें शिक्षणही देत असे. ज्यांचे कपडे घाण असतील त्यांना कपडे धुवायला शिकवी. त्यांना स्वच्छ अंघोळ घालून स्वच्छ कसें राहायचें तें शिकवी. वडाच्या पारापासून जवळच एक विहीर होती. त्या विहिरीचें पाणी काढून तो त्यांना अंघोळ घाली. त्यानें सर्व मुलांसाठीं संध्याकाळच्या कार्यक्रमाचें एक वेळापत्रकच करून टाकलें होतें. गाणें, गोष्टी, ड्रिल, खेळ, कपडे धुणें, अंघोळ वगैरे सर्व गोष्टी त्या वेळापत्रकांत निरनिराळ्या दिवशीं येतील असें त्यानें केलें होतें.

संध्याकाळचा त्याचा हा कार्यक्रम मुलांना फारच आवडल्यामुळें दिवसेंदिवस मुलांची संख्या वाढूं लागली आणि पंधरा दिवसांत ती १५० ला पोचली. तीं मुलें त्याच्या अगदीं अंकित झालीं. जणूं हें दीडशें जणांचें एक लष्करच त्याच्याजवळ तयार झालें. ह्याचा परिणाम त्याच्या सकाळच्या कामावरही झाला. सकाळच्या सफाईत मुलें सामील होऊं लागलीं. प्रत्येक जण स्वतःच्या घरून खराटा आणि टोपली घेऊन येई आणि त्याच्याबरोबर सफाईचें काम करी. ह्या कामासाठींही मुलांची संख्या पंचविसाच्या वर गेल्यावर त्यानें ५।५ जणांची एक तुकडी करून त्यांना सफाईसाठीं निरनिराळ्या जागा आंखून द्यायला सुरुवात केली. ह्यामुळें सफाईचें काम व्यवस्थित झालें.

संध्याकाळीं सात वाजतां तो मनुष्य जेवण करीत असे. मग धर्मशाळेच्या बाहेरच्या ओट्यावर बसून तो प्रार्थना करीत असे. सुरुवातीला त्याच्या प्रार्थनेंत मुलांखेरीज कोणीच येत नसे. पण पुढें लोकांनाही यायची इच्छा होऊं लागली. कारण कीं प्रार्थनेंत भजन, श्लोक वगैरे म्हणून झाल्यावर तो वर्तमानपत्रांत वाचलेल्या रोजच्या बातम्या मुलांना समजून सांगत असे. त्याची सांगण्याची रीत इतकी चांगली होती कीं मुलांना बातम्या ऐकण्यांत पुष्कळ मजा वाटे आणि तीं घरीं जाऊन त्या बातम्या वडील माणसांना सांगत. ह्यामुळें वडील माणसांनाही त्याच्या प्रार्थनेंत हजर राहाण्याची इच्छा होई. पण लोकांना शेतावरून यायला वेळ होई, त्यामुळें रात्रीं आठ वाजण्याची प्रार्थनेची वेळ त्यांना अनुकूल नव्हती. म्हणून लोकांनीं आठच्या ऐवजीं नऊची वेळ करण्याची त्याला विनंती केली आणि प्रार्थना धर्मशाळेंत न करतां गांवाच्या मध्यभागीं एक उंबराचें झाड आणि त्याचा पार होता, त्या ठिकाणीं प्रार्थना करावी असें त्याला सांगितलें. त्यानें तें कबूल केलें. मग लोकांनीं एक ग्यासचा दिवा पेटवून प्रार्थनेच्या जागीं ठेवायला सुरुवात केली. त्यामुळें तेथें चांगला उजेड होऊन लोकांना घटकाभर तेथें बसण्याला आनंद वाटूं लागला. हळुहळू ही प्रार्थना म्हणजे रोजची सभाच झाली. ह्या सभेंत लोकांकडून तो मनुष्य प्रश्न मागवी आणि त्यांचीं उत्तरें स्वतः देई. नंतर चर्चा होई. त्या चर्चेंत सर्वांना फारच आनंद वाटे.

९०० ६० ... ६३५ ... ८/१२/५४ ... वाचनालय शाखा



# ३. सहकारी पतपेढी

त्या नव्या माणसाला तुमचें नांव काय हा प्रश्न गांवांतल्या अनेक लोकांनीं अनेकवार विचारला. प्रश्न विचारून सर्वांनीं त्याला भंडावून सोडलें, तेव्हां त्यानें एकदा उत्तर दिलें कीं माझें नांव मी कुणालाच सांगणार नाहीं. तुम्ही मला वाटेल त्या नांवानें बोलावीत जा. त्या माणसाचें सारेंच कांहीं विचित्र होतें म्हणून लोकांना ह्याही विचित्रतेचें कांहीं वाटलें नाहीं. पण शाळेंतल्या एका शिक्षकानें एकवार सुचविलें कीं आपण ह्या माणसाला सेवकराम म्हणावें. सर्वांना हें नांव फार आवडलें. दुसऱ्या कोणीं सुचविलें कीं मौनी सेवकराम असें नांव द्यावें. झालें. त्या दिवसापासून त्या माणसाला सर्व लोक मौनी सेवकराम ह्या नांवानें ओळखूं लागले. आपणही ह्यापुढें त्याला सेवकराम ह्या नांवानें बोलावीत जाऊं.

सेवकरामला कळलें होतें कीं गांवांत दोन तरुण मुली दुःखी आहेत. एक काशीनाथ पाटलाची मुलगी तुळसी. तुळसी देखणी होती. वीस बावीस वर्षांची होती. स्वभावानें सालस होती. पण ती अशिक्षित आहे म्हणून तिच्या नवऱ्यानें तिला टाकलें होतें. दुसरी दुःखी मुलगी सावित्री. तिचा बाप गरीब होता, त्यामुळें तिचें लग्न होत नव्हतें. म्हणजे एका मुलीला नवऱ्यानें टाकलें होतें तर दुसरीचें लग्नच होत नव्हतें.

ह्या दोन मुलींचीं दुःखें दूर केलींच पाहिजेत असें सेवकरामला वाटलें. तुळसीचा प्रश्न कठीण होता. पण सावित्रीचा तितकासा कठीण नव्हता. तिचें लग्न पैशाच्या अभावीं थांबलें होतें. शिवाय ती हल्लीं धरणगांवांत राहात नव्हती. तिचा बाप धरणगांवांत यायला भीत होता, कारण कीं तो ब्राह्मण होता. त्याचें नांव नारायण अग्निहोत्री. १९४८ च्या जानेवारीच्या ३० तारखेला गोडसे नांवाच्या ब्राह्मणानें महात्मा गांधींना गोळी घालून ठार केल्यामुळें अब्राह्मण समाजांत ब्राह्मणाविषयींच्या प्रचंड क्रोधाची जी आग भडकली होती त्याची चांगलीच झळ नारायणलाही लागली होती. त्याचें वडिलोपार्जित घर लोकांनीं जाळून टाकलें होतें. घरांतली सगळी चीजवस्तु जळून खाक झाली होती. सुदैवानें नारायण स्वतःच्या एकुलत्या एक मुलीला लग्नासाठीं दाखवायला म्हणून कऱ्हाडला गेला होता, त्यामुळें तो आणि त्याची मुलगी हीं ह्या प्रचंड आगीपासून वांचलीं होतीं. नाहीं तर त्यांच्यावर जिवंत जळण्याचाच प्रसंग आला असता.

ह्या अत्याचाराची बातमी तो कऱ्हाडहून परत येत असतांना वाटेंतच त्याला मिळाली. त्यामुळें गांवांत परत जाणें त्याला धोक्याचें वाटलें. म्हणून

तो धरणगांवला न जातां कऱ्हाडला त्याचा मामा राहात असे तिकडे परतला होता.

नारायणाविषयीं सेवकरामनें लोकांकडून सर्व माहिती मिळवून घेतली. त्याच्यावर झालेल्या अत्याचाराबद्दल लोकांना आतां वाईट वाटत आहे अशी त्याची खात्री झाली होती. त्यानें लोकांना स्पष्टपणानें विचारलें कीं नारायणला परत बोलावून घ्यायला काय हरकत आहे ? लोकांनीं कांहींच हरकत नाहीं असें सांगितलें, तेव्हां त्यानें नारायणला पत्र लिहून परत बोलावून घेतलें.

नारायणला सावित्रीच्या लग्नाची घोर चिंता होती. मुलगी दिसायला नीटस होती, पण चांगलें स्थळ हुंडा घेतल्याशिवाय मिळत नव्हतें. त्याचा शोध सारखा चालूच होता. शोधतां शोधतां एक चांगलें स्थळ त्याला आढळलें. पण त्यासाठीं ५०० रुपये हुंडा आणि ५०० रुपये इतर खर्च, म्हणून १००० रुपये त्याला पाहिजे होते. आलेलें स्थळ इतकें चांगलें होतें कीं तें गमावणें त्याला योग्य वाटलें नाहीं. सेवकरामलाही तें पटलें. त्यानें त्याला मदत करण्याचा निश्चय केला.

गांवांतल्या ८।१० प्रमुख व्यक्तींकडून प्रत्येकीं शंभर सव्वाशें रुपये उसनवार घेऊन त्यानें एक हजार रुपये जमा केले. हे पैसे त्यानें स्वतःच्या जबाबदारीवर घेतले. लोकांचा त्याच्यावर इतका दांडगा विश्वास होता कीं त्यांनींही आनंदानें त्याला पैसे दिले. हे पैसे त्यानें सावित्रीच्या लग्नासाठीं नारायणला दिले.

पण सेवकरामनें खरी मजा केली ती ह्यापुढेंच. नारायणच्या मुलीच्या लग्नाचें नक्की होऊन मुहूर्त ठरला. ठरलेल्या दिवशीं वऱ्हाडी मंडळी

आली. लग्नांत सेवकरामनें उत्साहानें भाग घेतल्यामुळें गांवच्या लोकांनाही ह्या लग्नाविषयीं आपलेपणा वाटला. त्यामुळें सर्वांनीं आपापल्या परीनें मदत केली. कापडवाल्या दुकानदारानें कापड दिलें, शेतकऱ्यांनीं धान्य दिलें, वाजंत्र्यांनीं फुकट वाजवायचें ठरविलें आणि अशा प्रकारें सर्वांच्या सहकार्यानें नारायणला कांहींही खर्च करावा न लागतां लग्न-समारंभ आटपला. लग्नाची वरात निघण्याच्या पूर्वी गांवची प्रार्थना झाली. ह्या प्रार्थनेंत सर्व वऱ्हाडी मंडळीही कुतूहलानें हजर राहिली. प्रार्थनेनंतर सेवकरामनें लोकांना आश्चर्यचकित करून सोडणारी एक घोषणा केली. ती ही कीं आजच्या सुमुहूर्तावर गांवच्या लोकांनीं दिलेल्या पांचशें रुपयांच्या भांडवलानें धरणगांवची सहकारी पतपेढी सुरू करण्यांत येत आहे. गांवच्या लोकांनीं कधीं पैसे दिले ? हा प्रश्न कोणींतरी विचारला. तेव्हां सेवकरामनें सांगितलें कीं नारायणनें लग्नासाठीं राखून ठेवलेली रक्कम गांवलोकांनीं लग्नासाठीं सारी शिधासामुग्री पुरी पाडल्यामुळें तशीच आहे. ती वांचलेली रक्कम नारायणनें ह्या नव्या कामासाठीं दिली आहे. पण ही रक्कम नारायणची आहे असें त्याला म्हणतां येणार नाहीं. गांवच्या लोकांनीं लग्नाचा खर्च केल्यामुळें ही रक्कम वांचली. म्हणून ही रक्कम गांवच्या लोकांनींच दिली आहे, असें झालें. ह्या रकमेच्या जोरावर आपण आज पतपेढीसारखी संस्था सुरू करीत आहों. ह्याचे पहिले ५०० चे शेअर साऱ्या गांवाचे गणले जातील. ह्यानंतर ज्यांना ज्यांना शेअर घ्यायचे असतील त्यांनीं त्यांनीं ते घ्यावे, अशी विनंती त्यानें केली. त्याबरोबरच नारायणच्या जावयाला आणि सासऱ्यालाही त्यानें विनंती केली कीं लग्नाच्या खुशालींत त्यांनींही ह्या संस्थेचे कांहीं शेअर घ्यावे.

नवरा मुलगा सभेंत हजरच होता. तो चांगला सुशिक्षित होता. प्रार्थनेचें एकंदर वातावरण आणि सेवकरामचें प्रभावी व्यक्तित्व ह्याच्यामुळें तो भारावून गेला होता. सेवकरामनें प्रत्यक्ष त्याला उद्देशून जेव्हां मागणी केली, तेव्हां त्याच्यानें राहवलें नाहीं आणि हुंड्याची घेतलेली पांचशेंची रक्कम ह्या नव्या पतपेढीचे शेअर घेण्यासाठीं स्वतः देत असल्याचें त्यानें जाहिर केलें.


ह्यावर प्रार्थनासभेंत मोठा हर्षनाद झाला. टाळ्यांचा गजर शांत झाल्यावर सेवकरामनें पतपेढीची कल्पना लोकांना समजावून सांगितली. गांवच्या जावयानें दिलेले पैसे त्याला वाटेल त्या वेळीं परत मिळूं शकतील अशी त्यानें खात्री दिली. उलट त्यानें हे ५०० रुपये परत न घेतां पतपेढीचे शेअर चालू ठेवले तर सरकारी नियमाप्रमाणें ठरलेलें व्याज त्याला नफा म्हणून मिळत राहील, हेंही त्यानें समजावून सांगितलें. ह्यानंतर त्यानें गांवच्या लोकांनाही शेअर विकत घेण्याचा आग्रह केला. सर्व योजना फार आकर्षक वाटल्यामुळें कोणी १० चा तर कोणी २० चा तर कोणी ५० चे असे शेअर ज्याच्या त्याच्या ऐपतीप्रमाणें गांवच्या जवळजवळ शंभर लोकांनीं घेतल्याचें जाहीर केलें. सेवकरामनें सर्वांच्या रकमा लिहून घेऊन बेरीज केली तेव्हां ती ३५०० रुपये झाली. त्यानें जेव्हां ही रक्कम जाहीर केली तेव्हां सर्वांनीं पुन्हा एकदा टाळ्यांचा गजर केला.

मग सेवकरामनें लोकांचें अभिनंदन केलें आणि त्यांना सांगितलें कीं ह्या रकमेंतून गांवांतल्या लोकांपैकीं ज्याला पाहिजे असेल त्याला योग्य तें तारण घेऊन उसनवार पैसे मिळूं शकतील आणि ते सरकारनें नक्की केलेल्या व्याजाच्या दरानें.



# ४. होळीचा उत्सव

सेवकरामनें त्यानंतर पतपेढी वाढविण्यावरच स्वतःचें सर्व लक्ष केन्द्रित केलें. पसतीसशें रुपयांचें वचन मिळालें खरें, पण ते पैसे प्रत्यक्ष हातीं येणें आवश्यक होतें. पण लोकांजवळ पैसे असतील तर ते देतील ना? होळीच्या सुमारास शेतींतून थोडे बहुत पैसे हातीं येण्यासारखे होते, म्हणून सेवकरामनें ठरविलें कीं पतपेढीचें कायदेशीर उद्‌घाटन गुढी पाडव्यापासून करावें. सर्व लोकांना



त्यानें हें सांगितलें आणि ज्यांनीं ज्यांनीं पेढीचे शेअर घेतले होते, त्यांना त्यांना होळीच्या आंत स्वतःच्या शेअरचे पैसे भरण्याची व्यवस्था करायला त्यानें सांगितलें. सर्वांनीं तें कबूल केलें.

लोकांचें जीवन अधिक सुखमय करण्याचे सर्व उपाय योजण्याचा सेवकरामचा प्रयत्न होता. त्यानें पाहिलें कीं अनेक पिढ्या परकी राज्यसत्तेच्या गुलामींत राहिल्यामुळें लोकांतलें चैतन्य नाहींसें झाल्यासारखें झालें होतें. कोणत्याही गोष्टीविषयीं कोणालाच उत्साह नव्हता. सेवकरामच्या प्रेरणेनें तेवढ्यापुरता उत्साह लोक दाखवीत, पण रक्तांत भिनलेला निरुत्साह पुन्हा वर डोकें काढी आणि स्थिति पूर्ववत् होऊन जाई. ही परिस्थिति दूर व्हायला बराच अवधि लागणार होता हें सेवकरामला ठाऊक होतें. महात्मा गांधींसारख्या जगद्वंद्य विभूतीचा देहान्त झाल्याला फार काळ गेला नव्हता. पण एवढ्यांतच जणूं सारें राष्ट्र त्यांना विसरून गेलें होतें. रक्तांत भिनलेल्या गुलामीचाच हा परिणाम होता, हें सेवकरामला पटलें होतें. राजकीय गुलामी जाऊन देश राजकीय दृष्टीनें स्वतंत्र झाला होता, पण त्या स्वतंत्रतेचीं बीजें अद्याप लोकांत रुजलीं नव्हतीं. तीं रुजविण्याच्या हेतूनेंच सेवकराम धरणगांवला आला होता.

उत्सव मनुष्याला नवें चेतन देतो, पण उत्सवाचें स्वरूप सोज्ज्वल नसलें तर नव्या चेतनेच्या ऐवजीं त्यांतून कुसंस्कारच जास्त प्रमाणांत येतात. दरवर्षीं महाराष्ट्राच्या खेड्यांपाड्यांतून होळीचा उत्सव पाळण्यांत येतो. पण होळीच्या प्रसंगानें मनांतल्या साऱ्या बीभत्स भावनांना बाहेर प्रकट करण्याची जी सूट घेतली जाते, त्यामुळें घाणेरड्या भावना उत्तेजित होतात. धरणगांवचा होळीचा उत्सव इतर गांवांप्रमाणेंच होत

असे. धुळवडीच्या दिवशींचे जंगली प्रकार आणि शिवीगाळ तेथेंही होत असे. होळींत जाळण्यासाठीं घरांचीं दारें-खिडक्या तोडून आणणें, होळीसाठीं पैसे देणार नाहीं त्याला शिव्या देणें, अब्रूदार स्त्रियांविषयीं वाटेल तसे कुत्सित शब्द वापरणें, कानानें ऐकवणार नाहींत अशा शिव्या बोलणें आणि सर्वांत जास्त म्हणजे अगदीं जंगली रीतीनें शंखध्वनि करणें, हे सारे प्रकार धरणगांवांतही होतेच.

ह्या वर्षी होलिकोत्सव अगदीं निराळ्याच प्रकारानें करायचा असें सेवकरामनें ठरविलें आणि त्यासाठीं त्यानें तयारी सुरू केली. मुलांसाठीं त्यानें एक लहानसें नाटक लिहून तें बसवायला सुरुवात केली. हुतूतू, आट्यापाट्या, खो खो, कुस्त्या, दांडपट्टा, उंच उडी, लांब उडी, वगैरे खेळ आणि शर्यतींची तयारी त्यानें चालविली. ह्यांत गांवांतल्या मुलींनींही भाग घ्यावा असा आग्रह त्यानें धरला आणि मुलीही त्यासाठीं तयार झाल्या. धुळवडीच्या दिवशीं राख, माती, डांबर वगैरे घाणेरड्या वस्तूंचा उपयोग न करतां केवळ रंगांचाच उपयोग करून लोकांनीं खेळावें असा सल्ला त्यानें दिला.

आणि लोकांनीं—विशेषतः गांवच्या तरुणांनीं—सेवकरामला पुष्कळ सहकार दिला. तयारी जोरांत होऊं लागली. हळुहळू होळीचा दिवस जवळ आला. मुलांनीं लाकडें जमवायला सुरुवात केली. तरुणांनीं पैसे जमवायला सुरुवात केली. खेळाच्या तालमी जोरांत चालूं लागल्या. नाटकाची रंगीत तालीम घेतली गेली.

होळीचा दिवस उजाडतांच धर्मशाळेंतून प्रभातफेरी निघाली. सर्वांच्या हातांत गुलाल होता. गाणीं गात गात आणि हवेंत गुलाल उधळीत

प्रभातफेरी चालली. प्रभातफेरी पुरी झाल्यावर ग्राम-सफाईची स्पर्धा सुरू झाली. प्रत्येकानें स्वतःचें अंगण अगदीं साफ करून, सारवून, सुंदर रांगोळ्या वगैरे घालून आकर्षक बनवावें आणि गांवांतल्या पांच परीक्षकांनीं सर्व अंगणें पाहून सर्वांत अधिक सुंदर अंगण असेल त्याला बक्षीस दिलें जावें, असें ठरलें होतें. सर्वांनीं ह्यांत कसून मेहनत घेतली. ह्या स्पर्धेत भाग घेतला नाहीं अशीं फारच कमीं घरें होतीं. पांचही परीक्षक सगळ्या गांवांत हिंडले. त्यांनीं सर्वांचीं अंगणें पाहिलीं आणि सर्वांनीं एकमतानें काशीनाथ पाटील ह्यांच्या अंगणाला पहिला नंबर दिला. अर्थातच त्या अंगणावर एकट्या तुळसीनेंच सारी मेहनत केली होती. तुळसीच्या अंगणाला पहिला नंबर मिळाला हें पाहून सेवकरामला फार आनंद झाला आणि सर्वांच्या समोर त्यानें तुळसीची पुष्कळ प्रशंसा केली.

ह्यानंतर रंगलीला झाली. रंगलीलेंत पुष्कळ लोक सामील झाले होते. मुलें होतीं, तरुण होते, मुली होत्या. मोठीं माणसें पहिल्यानें थोडीशीं मागें राहिलीं होतीं, पण लहानांचा उत्साह पाहून त्यांच्यानेंही राहवलें नाहीं आणि तेही मैदानांत आले. घरांत शिरून शिरून मुलांनीं वडील माणसांच्या अंगावर रंग टाकला. त्यामुळें घरांतून वडील माणसेंही रंग घेऊन बाहेर आलीं. त्यांत बायकाही होत्याच.

अशा तऱ्हेनें दोन तास सर्वांनीं खूप आनंद केला. बीभत्स शिवी ऐकायला आली नाहीं. बीभत्स चाळा एकही दिसला नाहीं. साऱ्या गांवांत शुद्ध आनंदाचें आणि उल्हासाचें वातावरण पसरलें. ह्या आनंदांत सेवकरामनेंही संपूर्ण भाग घेतला होता. त्याला मुलांनीं नखशिखांत रंगवून सोडलें होतें. देवाची पूजा करण्यासाठीं म्हणून प्रत्येकजण

ज्याप्रमाणें मूर्तीवर फूल टाकतो, त्याप्रमाणें स्वत:चें प्रेम प्रकट करण्यासाठीं सेवकरामवरही प्रत्येकानें रंग टाकला. त्यामुळें सेवकरामचें सारें शरीर अनेक रंगांनीं रंगून गेलें.

ह्या सर्व आनंदापासून अलिप्त राहिली होती मात्र एक तुळसी. ही गोष्ट इतर लोकांच्या फारशी लक्षांत आली नव्हती. पण सेवकरामच्या लक्षांत हें ताबडतोब आलें. म्हणून रंगाचा खेळ सुरू झाल्यावर थोड्याच वेळांत सेवकराम सर्वांना नकळत हळूच काशीनाथच्या घरांत गेला आणि त्यानें तुळसीला हाक मारली. तुळसीनें उत्तर दिलें नाहीं, म्हणून तो आंत सैंपाकघराकडे गेला. तेथें तुळसी देवापुढें बसून रडत होती. सेवकरामनें तिला रडण्याचें कारण विचारलें तेव्हां ती जास्तच रडूं लागली. ह्या वेळीं तिला कांहींही विचारणें बरें होणार नाहीं, असा विचार करून सेवकराम तिला तसाच सोडून घरांतून बाहेर आला आणि तसाच पुन्हा गर्दींत मिसळला.

अशा रीतीनें रंगोत्सव पुरा झाला. पुन्हा चार वाजतां उत्सवाचें काम सुरू झालें. खेळ आणि शर्यती झाल्या. सर्वांनीं खूप उत्साहानें भाग घेतला. जिंकणाऱ्यांच्या नांवांचा गौरव करण्यांत आला. संध्याकाळपर्यंत खेळांचा कार्यक्रम झाला. नंतर सर्वांनीं आपापल्या घरीं जाऊन जेवणखाण केलें आणि पुन्हा उंबराच्या झाडाखालीं सर्वजण प्रार्थनेसाठीं आले.

प्रार्थना आणि प्रवचन झाल्यावर नाटक झालें. नाटक चांगलें वठलें.

अशा रीतीनें धरणगांवचा होलिकोत्सव उत्साहानें पार पडला. गांवाच्या इतिहासांत इतक्या खेळीमेळीनें सर्वांनीं मिळून कोणताच उत्सव कधींच साजरा केला नव्हता. आज सगळीकडे आनंदीआनंद दिसत होता.



# ५. तुळसीची करुणकथा

होलिकोत्सवानंतर लगेच सेवकरामनें तुळसीच्या बाबतींत लक्ष घातलें. उत्सवाच्या वेळीं तिला रडत असलेली पाहून त्याचें मन कळवळलें होतें. तिचें दु:ख दूर केलेंच पाहिजे असें सेवकरामला वाटलें. काशीनाथ पाटील गांवचा पुढारी होता, पण त्याची आर्थिक स्थिति फारच खालावली होती. तुळसी त्याची एकुलती एक मुलगी. तिची आई लहानपणींच वारली होती. दुसरें लग्न केलें तर स्वत:च्या लाडक्या लेकीला सावत्रपणाचें दु:ख सहन करावें लागेल म्हणून काशीनाथनें लग्न केलें नव्हतें. तुळसी पंधरा वर्षांची झाली तेव्हां काशीनाथनें तिच्या लग्नाचा विचार ठरवला. औंधच्या पाटलाचा मुलगा डॉक्टरी कॉलेजांत शिकत होता. तो फार हुशार होता आणि डॉक्टरीची परीक्षा

दिल्यावर त्याला विलायतेला पाठवायचें असें त्याच्या बापानें ठरवलें होतें. हा मुलगा तुळसीला मिळावा असें काशीनाथला वाटलें आणि तो तुळसीला घेऊन औंधला गेला. मुलगी सर्वांना पसंत पडली, पण लग्नाचा सर्व खर्च काशीनाथनें केला तरच मुलगी करून घेऊं असें वरपक्षवाल्यांनीं सांगितलें. काशीनाथनें ही अट कबूल केली. नंतर लग्नाचा मुहूर्त घेतला गेला. धरणगांवलाच लग्न झालें. वऱ्हाडी मंडळींचें थाटाचें स्वागत झालें. काशीनाथनें उत्साहाच्या भरांत खूप खर्च केला. हे सगळे पैसे त्यानें कर्जाऊ घेतले होते. अर्थातच ह्यासाठीं त्यानें जमीन गहाण टाकली होती.

लग्नसमारंभ झाला. पण हें लग्न तुळसीच्या हिताचें ठरलें नाहीं. तुळसी फारशी शिकली नव्हती. आई लहानपणींच वारल्यामुळें ती ८।९ वर्षांची असतांनाच घरकामाचा सारा भार तिच्या शिरावर येऊन पडला, म्हणून शाळेचें शिक्षण नियमितपणानें होऊं शकलें नव्हतें. कशीबशी चौथ्या इयत्तेपर्यंत ती पोचली आणि नंतर तिनें शाळा सोडली. त्यामुळें साधारण लिहावाचायला येण्याइतकेंच तिचें शिक्षण झालें होतें.

तिच्या नवऱ्याचें नांव विश्वासराव होतें. लग्न झाल्यावर लगेच तो कॉलेजसाठीं पुण्याला निघून गेला होता. लग्नानंतर ३।४ दिवसांसाठीं तुळसी सासरीं गेली, त्यानंतर तिच्या सासऱ्यानें तिला पुन्हा कधींच सासरीं नेली नव्हती. तुमची मुलगी अशिक्षित असल्यामुळें मुलाला ती पसंत नाहीं, म्हणून तुमच्या मुलीला आम्ही नांदवणार नाहीं असें विश्वासरावाच्या वडिलांनीं स्पष्टपणें सांगितलें होतें. काशीनाथला ह्यामुळें फारच दुःख झालें, पण त्याला कांहींच करणें शक्य झालें नाहीं. तुळसी सासरीं न जातां माहेरींच राहिली.

ह्यानंतर मुलगा डॉक्टरी परीक्षा देऊन पुढच्या अभ्यासासाठीं विलायतेला गेला. तिथला अभ्यास पुरा करून मोठी पदवी घेऊन तो परत आला. त्यानें पुण्याला स्वतःचा दवाखाना काढला. थोड्याच वेळांत त्याचा चांगला जम बसला आणि त्याला पुष्कळ पैसे मिळूं लागले. त्याला तुळसीचें स्मरण कधींच झालें नाहीं. लग्नाच्या वेळीं देखील त्यानें तिला पाहिली नव्हती आणि नंतरही तो प्रसंग कधींच आला नव्हता.


चांगला जावई मिळावा म्हणून स्वतःचें होतें नव्हतें तें सारें काशीनाथनें घालवलें होतें. त्याची जमीन सावकाराकडे गहाण होती. तो स्वतः जमिनीची लागवड करीत होता, पण जमिनीच्या उत्पन्नाचा अर्धा भाग व्याज म्हणून द्यावा लागत होता. ह्यामुळें काशीनाथची आर्थिक स्थिति बरीच खालावली होती. तुळसी वयानें वाढूं लागली तसतसें तिचें दुःख तिला जास्त जाणवूं लागलें. 'नवऱ्यानें टाकलेली' हा कलंक तिच्या कपाळीं लागला होता. विधवेच्या दुःखापेक्षां नवऱ्यानें टाकलेल्या बायकोचें दुःख जास्त कडू असतें. वैधव्य हा ईश्वरी कोप असतो. पण नवऱ्यानें टाकणें ह्यांत मानहानि असते. तुळसीच्या कोमल हृदयावर ह्या गोष्टीचा फारच परिणाम झाला.

लग्नानंतरचीं ५।६ वर्षें तिनें दुःखांतच काढलीं होतीं. घरंदाज घराणें असल्यामुळें एकदा झालेलें लग्न वज्रलेपासारखें होतें. त्यामुळें तुळसीच्या जीवनांत सुखाची आशा राहिली नव्हती. नवरा जीवंत असूनही पदरीं वैधव्य आल्यासारखी तिची स्थिति झाली होती.

तुळसीनें उत्सवांत भाग कां घेतला नाहीं हें सेवकरामनें सहज ताडलें. नवऱ्याच्या सुखापासून वंचित झालेल्या तरुणीला रंगलीला कशी

आवडणार ? सेवकरामचें हृदय कळवळलें. त्यानें काशीनाथशीं चर्चा केली आणि डॉ. विश्वासरावाकडून तुळसीचा स्वीकार होईल असा प्रयत्न करण्याचें त्यानें काशीनाथला आश्वासन दिलें. पण ह्यासाठीं पहिलें काम तिला चांगलें शिक्षण देणें हें होतें. ह्या कामीं मदत करण्याचें आश्वासन सेवकरामनें दिलें. सेवकरामनें तुळसीलाही दोन आश्वासनाच्या गोष्टी सांगितल्या. त्याच्या आश्वासनामुळें तुळसीलाही नवा उत्साह आला आणि तिनें मन लावून शिकण्याची तयारी दाखविली.

पण इतकें वय झाल्यावर तिला कसें आणि काय शिकवायचें ? हा प्रश्न सोपा नव्हता. सेवकरामनें विचार केला कीं तिचा नवरा डॉक्टर असल्यामुळें तिला नर्सिंगचें शिक्षण दिलें तर फायदा होईल. हा विचार काशीनाथलाही पटला. धरणगांवापासून वीस मैल दूर एका शहरांत कस्तूरबा ट्रस्टनें चालविलेलें एक बाळंतपणाचें हॉस्पिटल होतें. तेथें खेड्याच्या कमी शिकलेल्या बायकांना नर्सिंगचें शिक्षण देण्याची व्यवस्था केली होती. त्या हॉस्पिटलमध्यें तुळसीला पाठवावें असें ठरलें आणि त्याप्रमाणें एखाद्या आठवड्यांतच तुळसीची रवानगी करण्यांत आली. तुळसीला घर सोडतांना रडूं कोसळलें. किशा तर तिला बिलगून ओक्साबोक्शीं रडूं लागला. काशीनाथचे डोळेही ओलावले. तिला निरोप देण्यासाठीं सारा गांवच वेशीपर्यंत गेला. तिला शहरांत पोचविण्यासाठीं काशीनाथ आणि सेवकराम हे दोघे तिच्याबरोबर गेले आणि तुळसीच्या करुण जीवनाला नव्या आशेचे अंकुर फुटले.



# ६. पतपेढीची प्रगति

पाडव्याला पतपेढीचें रीतसर उद्घाटन करावयाचें असें ठरलें असल्यामुळें होळीच्या उत्सवानंतर सेवकरामचें सारें लक्ष त्या कामांतच वेधलें गेलें होतें. होळीपर्यंत शेअरच्या बहुतेक सर्व रकमा वसूल झाल्यामुळें सेवकरामच्या हातांत तीन हजारांहून अधिक रक्कम आली होती. बाकीचे एक हजार अद्याप वसूल व्हावयाचे होते. पाडव्यापर्यंत तेही वसूल होतील अशी सेवकरामला खात्री वाटत होती. म्हणून उद्घाटनापूर्वीं जी तयारी करायला पाहिजे होती ती त्यानें करून ठेवली.



त्यागमूर्ति कांबळेबुवा जिल्ह्याचे प्रख्यात त्यागी पुढारी होते. १९२० सालीं स्वतःची सर्व इस्टेट टिळक स्वराज्यफंडाला अर्पण करून ते एका कांबळ्यासहित घराबाहेर पडले होते. पुढचें सर्व जीवन त्यांनीं गांधीजींच्या

नेतृत्वाखालीं समाजसेवा करण्यांत घालविलें होतें. त्यांच्या प्रेरणेनें अनेक उपयुक्त संस्था महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं स्थापन झाल्या होत्या. सर्वस्वाचा त्याग करून त्यांनीं फक्त एक कांबळेंच स्वत:जवळ ठेवलें म्हणून त्यांना लोक त्यागमूर्ति कांबळेबुवा म्हणूं लागले. सरकारदरबारीं किंवा सुशिक्षित वर्गांत ते त्यागमूर्ति ह्या नावानें प्रसिद्ध होते. पण खेडेगांवचे लोक त्यांना कांबळेबुवा म्हणूनच ओळखत असत.

सेवकरामनें धरणगांवच्या पतपेढीचें उद्घाटन त्यागमूर्तींच्या हस्तें करावयाचें ठरवलें. पाडव्याचा दिवस नक्की करण्यांत आला. त्यागमूर्तींला पत्र लिहिलें. त्यानीं उद्घाटनासाठीं येण्याचें कबूल केलें. मग निमंत्रणपत्रिका छापल्या. जिल्ह्याचे सर्व अधिकारी, पुढारी, मुख्य मुख्य व्यापारी, मुख्य मुख्य शेतकरी, शिक्षण-संस्थांचे संचालक वगैरे सर्वांना निमंत्रणपत्रिका धाडल्या गेल्या. इतके मोठे मोठे लोक गांवांत येणार, त्यांची व्यवस्था करणें सोपें काम नव्हतें. पण सेवकरामचा हेतु ह्या निमित्तानें सर्वांना बोलावून धरणगांवांत चाललेल्या ग्रामसुधारणेच्या कार्याचें प्रत्यक्ष निरीक्षण करण्याची संधि सर्वांना द्यावी हा होता. ह्यामुळें कार्याला प्रसिद्धि मिळून इतर गांवांतही असे प्रयोग करण्याची प्रेरणा लोकांना मिळेल, असें सेवकरामला वाटलें.

शेवटीं पाडवा उजाडला. सकाळीं १० वाजल्यापासून पाहुणे मंडळी येऊं लागली. मौनी सेवकरामचें नांव आसपासच्या गांवांत चांगलेंच प्रख्यात झालें होतें. जिल्हाधिकारी आणि जिल्ह्याचे पुढारी ह्यांच्या कानांवरही त्याचें नांव गेलेंच होतें. पतपेढीच्या उद्घाटनाचें कोणाला फारसें आकर्षण वाटलें नाहीं, पण मौनी सेवकरामला पाहाण्याची मात्र

सर्वांना इच्छा होती. म्हणून ज्यांना ज्यांना निमंत्रणें धाडलीं गेलीं होतीं, त्यांपैकीं निदान ७५ टक्के लोक तरी ह्या समारंभाला आले.

सर्व व्यवस्था अगदीं चोख असल्यामुळें सर्वांना संतोष वाटला. गांवाची आदर्श स्वच्छता पाहून सर्वांनीं तोंडांत बोटें घातलीं. त्यागमूर्तीला तर फारच आनंद झाला. उद्‌घाटन समारंभाच्या वेळीं सेवकरामनें जें भाषण केलें तें फारच परिणामकारक झालें. स्वतःच्या ग्रामसुधारणेच्या सर्व कल्पना त्यानें त्या भाषणांत सांगितल्या. पतपेढीचा इतिहास सांगितला. पांचशें रुपयांची रक्कम युक्तीनें सेवकरामनें मिळविली त्याबद्दल सर्वांनीं मुक्तकंठानें सेवकरामची वाखाणणी केली. उद्‌घाटन प्रवचनांत कांबळेमहाराजांनीं फारच मार्मिक शब्दांत सेवकरामचा गौरव केला. कांहीं माणसें खूप त्यागी असतात, पण त्यांच्यांत कर्तृत्वशक्ति नसते. दुसरीं कांहीं माणसें खूप कर्तृत्ववान असतात, पण त्यांच्यांत त्यागवृत्ति बिलकूल नसते. म्हणून दोघांचा समाजाला व्हावा तसा उपयोग होऊं शकत नाहीं. सेवकरामांत त्यागवृत्ति आणि कर्तृत्वशक्ति ह्या दोन्ही गुणांचा संयोग असल्यामुळेंच धरणगांवांत ते इतक्या अल्पकाळांत इतकें सुंदर कार्य करूं शकले. ह्या शब्दांनीं त्यागमूर्तीनें सेवकरामचा गौरव केला. नंतर त्यांनीं ग्रामसंघटनेच्या त्याच्या प्रयत्नांत सर्वांनीं मदत करावी अशी विनंती करून जिल्ह्यांत इतर ठिकाणींही अशा पद्धतीनें कार्य व्हावें अशी आशा त्यांनीं प्रगट केली.

सर्व समारंभ पुरा होऊन विधिसर उद्‌घाटन झाल्यानंतर सेवकरामनें आलेल्या पाहुण्यांना पतपेढीचे शेअर घेऊन तिला मदत करण्याची विनंती

केली. त्या विनंतीला पाहुण्यांनीं बरोबर मान दिला आणि ह्या उत्सवाच्या निमित्तानें दोन हजारांचे शेअर खपले.

समारंभ पूर्ण झाला. सर्वांना चहापाणी देण्यांत आलें. पाहुणे मंडळी अत्यंत खूष झाली. सर्वजण प्रसन्न चित्तानें सेवकरामची वाखाणणी करीत परत गेली.

आतां पतपेढीचें भांडवल वाढून सहा हजाराला गेलें होतें. कार्याच्या आरंभासाठीं ही चांगलीच रक्कम होती. सेवकरामनें पेढीच्या विकासासाठीं अनेक युक्त्या योजल्या. गांवांतल्या शाळेला उन्हाळ्याची सुट्टी सुरू झाली होती. ह्याचा फायदा घेऊन सेवकरामनें एका ग्रामयात्रेचें आयोजन केलें. निवडक अशीं २५ मुलें बरोबर घेऊन त्यानें खेडोपाडीं जाण्याचें ठरविलें. बरोबर एक बैलगाडी घ्यायचें ठरलें.

ठरलेल्या दिवशीं ही यात्रा निघाली. मुलांमध्यें उत्साह मावत नव्हता. पहिला मुक्काम जवळच पांच मैलांवर करजगांव नांवाचें खेडें होतें तेथें घेतला. सकाळीं नऊ वाजतांच ही यात्रा करंजगांवला पोंचली. तेथें आगाऊ खबर दिली असल्यामुळें गांवच्या लोकांनीं यात्रेचें उत्साहानें स्वागत केलें. सर्वांच्या उतरण्याची आणि जेवणखाणाची छान व्यवस्था केली होती. यात्रेंतल्या मुलांनीं ग्रामजनांचें उत्तम मनोरंजन केलें. खेळ दाखविले. रात्रीं प्रार्थना सभा झाली. तेथें सेवकरामनें ग्रामसुधारणेच्या कल्पना मांडल्या. धरणगांवच्या पतपेढीची हकीकत सांगितली आणि पतपेढीसाठीं धान्याची मागणी केली. धान्याच्या रूपानेंच शेअर भरावे, असें त्यानें सांगितलें. लोकांनीं भराभर ५।५ किंवा १०।१० शेर धान्य लिहविलें. पाहातां पाहातां धान्याचा चांगलाच आंकडा पेढीसाठीं लिहविला गेला.

तें सर्व धान्य दुसऱ्या दिवशीं जमा करून धरणगांवला पाठवून देण्याचें काम गांवलोकांना सोंपवून सेवकरामनें गांवांतला मुक्काम हलविला आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं यात्रेंतल्या दुसऱ्या गांवाला प्रयाण केलें. ही यात्रा चौदा दिवस चालली. चौदा गांवांत प्रचारकार्य झालें. चौदा गांवांतून धान्याचें दान मिळालें आणि चौदा गांवांत धरणगांवचें कौतुक झालें.

हें जमा झालेलें धान्य सेवकरामनें लेव्हीच्या भावानें सरकारला विकलें आणि त्याची आलेली रक्कम ज्या ज्या गांवांनीं धान्य दिलें होतें त्या त्या गांवाच्या नांवावर दिलेल्या धान्याच्या प्रमाणांत शेअर म्हणून जमा करण्यांत आली आणि प्रत्येक गांवाला मिळालेल्या शेअर रकमेची पावती पाठविण्यांत आली.

सेवकरामच्या ह्या अजब कार्यशक्तीमुळें गांवच्या लोकांचा उत्साह खूपच वाढला. पतपेढीच्या विकासासाठीं प्रत्येकजण झटून प्रयत्न करूं लागला. पतपेढीतर्फें एक रेशनिंगचें दुकान, एक कापडाचें दुकान, एक इतर वस्तूंचें दुकान व एक किराणा दुकान अशीं चार दुकानें उघडण्यांत आलीं. ह्याशिवाय खादी विणण्यासाठीं दोन माग टाकण्यांत आले. तेलाची एक घाणी आणि बैल जोडून चालणारी पिठाची एक चक्कीही टाकण्यांत आली. दुकानांत माल भरला जाऊं लागला. गांवच्या मुलांनीं आणि लोकांनीं कांतलेलें सूत दोन्ही मागांवर विणलें जाऊं लागलें. तेलाच्या घाणीवर तेल निघूं लागलें आणि बैलाच्या चक्कीवर पीठ दळलें जाऊं लागलें. ह्या सर्व कामांतून पेढीला दररोज चांगला नफा होऊं लागला.

ह्याशिवाय पेढीचें कर्ज देण्याचें खातेंही चालू झालें. पांच रुपयांपासून पांचशेंपर्यंतचें कर्ज योग्य तारण घेऊन लोकांना देण्यांत येई. व्याजाचा दर कमी झाल्यामुळें लोकांना ही योजना फारच सोयीची झाली. कर्ज देणें न देणें ही गोष्ट सेवकरामनें स्वतःच्या हातांत ठेवली होती. लोकांनीं होतां होईतों कर्ज घेऊंच नये असा त्याचा कटाक्ष होता. म्हणून तो सर्वांना कर्ज न घेण्याबद्दल समजावून सांगे आणि अगदीं गत्यंतर नाहीं असें कळलें म्हणजेच कर्ज देई.



## ७. श्रमयज्ञाचें सामर्थ्य

काळ झपाट्यानें जात होता. सेवकरामला धरणगांवांत आल्याला दीड वर्ष होऊन गेलें होतें. त्यानें गांवांत अनेक सुधारणा ह्या काळांत घडवून आणल्या होत्या. गांवच्या शाळेचें जुनें स्वरूप बदलून टाकून तिचें रूपांतर पायाच्या पद्धतीच्या शाळेंत त्यानें केलें होतें. शेती हा मुख्य मूलोद्योग घेऊन सूतकाम हा जोड उद्योग त्यानें ठेवला होता. पायाच्या पद्धतींत शिकून तयार झालेले शिक्षक मागवले होते. सरकारकडून ह्या शाळेला लागणारीं साधनें घेण्यासाठीं स्पेशल ग्रँट त्यानें मंजूर करवून घेतली होती. शाळेचें वातावरण अगदीं बदलून गेलें होतें. मुलें उत्साही आणि सेवाभावी झालीं होतीं. गांवची स्वच्छता मुलांनींच संभाळली होती. सेवकरामला कामाचा बोजा फार राहात असल्यामुळें

२०२० १०७४२

ग्रामसफाई वगैरे कार्यक्रमांतून तो मुक्त झाला होता. तो फक्त रात्रींच्या प्रार्थनेंत हजर राही. त्याला अलीकडे वरचेवर जिल्ह्याच्या गांवीं जावें लागे. पतपेढीच्या अनेक नव्या योजनांसाठीं सरकारी मंजुरी आणि मदत घेण्यासाठीं तो जात असे.

गांवांत दुसरी सुधारणा त्यानें केली. गांवच्या गायीम्हशींच्या शेणांतून गवऱ्या करून लोक जाळीत असत. सेवकरामनें शेणाचें खत करण्याचें महत्त्व लोकांना पटवून गवऱ्या करण्याची प्रथा बंद केली. ठिकठिकाणीं खड्डे खोदून खत होऊं लागलें.

गांवांत सार्वजनिक शौचकूप नव्हते. गांवाच्या बाहेर शेतांत खड्डे खोदून त्यानें इकडून तिकडे उचलून ठेवतां येतील असे गांधीजींच्या आश्रमांतल्या पद्धतीचे शौचकूप तयार करविले होते. त्यामुळें विशेषत: भगिनी वर्गाची फार चांगली सोय झाली. ह्या शौचकुपांतल्या खड्डयांतलें खत तयार झाल्यावर त्याचा उपयोग शेतींत होऊं लागला.

ह्या सर्व सुधारणांची गम्मत ही होती कीं ह्यांतून जो कांहीं फायदा होई तो साऱ्या गांवचा गणला जाई. कोणाही एका व्यक्तीचा त्याच्यावर अधिकार नसे. हा सारा नफा पतपेढींत जमा केला जाई.

अशा प्रकारें लहान मोठ्या सुधारणा सेवकराम करूं शकला. त्यामुळें धरणगांवचें जीवन अधिक सुखाचें झालें. पण धरणगांवचा मुख्य प्रश्न शेतीचा होता. पावसाचें प्रमाण कमी होतें. शेतीसाठीं कालवे करण्याची जरूर होती, पण कालवे करणें म्हणजे फार खर्चाचें काम. शिवाय धरणगांवाच्याजवळ दोन तीन मैलांवर जी नदी होती ती उन्हाळ्यांत

आटून जाई, म्हणून तिच्यांतून कालवा काढणें शक्य नव्हतें. ह्या योजनेसाठीं सरकारच्या पंचवार्षिक योजनेवरच सर्वस्वीं विसंबून राहाणें आवश्यक होतें. म्हणून सेवकरामनें हा प्रश्न भविष्यकाळावर सोडला.

पण गांवाच्या दुसऱ्या अडचणी तावडतोब दूर करायचें त्यानें ठरवलें. गांवांत सफाई छान होती पण गांवांत रस्ते पक्के नव्हते. धरणगांवाहून बाहेरगांवीं जाण्याचे रस्तेही पक्के नव्हते. पावसाळ्यांत तर फारच त्रास होई. गांवापासून स्टेशन तीन मैल दूर होतें. त्यामुळें पावसाळ्यांत स्टेशनवर जातांना फार त्रास पडे. कधीं कधीं गाड्या चिखलांत रुतून बसत.

ही अडचण तावडतोब दूर करण्याचें काम त्यानें हातीं घेतलें. त्यानें श्रमयज्ञाच्या बळावर हें काम करायचें ठरवलें. गांवांत जितक्या बैलगाड्या होत्या त्या सर्वांची मागणी त्यानें केली. गांवांत खोदण्यासाठीं जेवढ्या पहारी, फावडीं, कुदळी वगैरे होत्या त्याही त्यानें जमा केल्या. नंतर गांवांतल्या प्रत्येक सज्ञान स्त्रीपुरुषानें रोज चार तास ह्या कामासाठीं द्यायचे असें त्यानें लोकांकडून कबूल करवून घेतलें. मुलांनीं लहान लहान टोपल्या किंवा फावडीं घेऊन मदतीस राहावें असें ठरलें.

दिवस उन्हाळ्याचे होते. चैत्र पौर्णिमेला ह्या कामाचा प्रारंभ करण्यांत आला. प्रथम गांवांतले रस्ते सुधारण्याचें काम हातीं घेतलें. शेजारच्या टेकडींतून काळे दगड तोडून त्याची खडी गांवांत येऊं लागली. बायकांनीं पाणी पुरवायला सुरुवात केली. लोकलबोर्डाकडून मोठे दोन रोलर मागवून घेऊन प्रत्येक रोलरला चार चार बैल लावून त्याचा उपयोग रस्त्यावरची खडी बसविण्यासाठीं करण्यांत येऊं लागला. हळुहळू गांवचे

रस्ते तयार होऊं लागले. हजार हात कामाला लागल्यामुळें प्रत्यक्ष भगवानच अवतरले.

"सहस्र हस्तें कमला वरानें, देतां किती घेशिल दो करानें?"

ह्या कवीच्या वचनाला अनुसरून धरणगांवचे हजार हात हे भगवान् विष्णूचेच हजार हात झाले. मग धरणगांवच्या भाग्यांत काय कमीपणा येणार? हा श्रमयज्ञ होता. प्रत्येकजण कसलीच अपेक्षा ठेवल्याशिवाय काम करीत होता. मन लावून काम करीत होता. तेथें कोणी मुकादम नव्हता, मजुरीचा प्रश्न नव्हता, वेठ नव्हती. सर्व कांहीं स्वेच्छेनें होत होतें. आनंदानें होत होतें. श्रमयज्ञाचा महिमा अपार आहे. त्याच्यांतून उत्पन्न होणारी समृद्धि कधींही नाश पावत नाहीं.

धरणगांवचे रस्ते सुंदर झाले. गांवाचें रूप बदलून गेलें. पतपेढीतर्फे रस्त्यांवर ठिकठिकाणीं राकेलचे दिवे लावले गेले. लोकांना फार आनंद झाला. रस्त्यावर कोणींही घाण करतां कामा नये असा कडक नियम ठेवला होता. लहान मुलेंसुद्धा गांवाबाहेर शौचकूपांत शौचादि विधि करीत. इतकेंच काय, पण गांवांतल्या रस्त्यावर कोणी लघुशंका न करावी म्हणून गांवांत चार ठिकाणीं मुतऱ्या बांधल्या गेल्या होत्या. ह्या रीतीनें धरणगांवला अत्यंत सोज्ज्वळ स्वरूप मिळालें.


गांवचे रस्ते झाल्यावर लोकांनीं स्टेशनचा रस्ता हातीं घेतला. पण हें काम ताबडतोब संपण्यासारखें नव्हतें. तीन मैलांची सडक करायची म्हणजे कांहीं पोरखेळ नव्हता. ह्याच रस्त्यावर दुसरीं दोन खेडीं होतीं. त्या खेड्यांतल्या लोकांनीं धरणगांवांत झालेलें रस्त्याचें काम पाहिलें होतें. त्यामुळें त्यांनीं मदत करण्याचें आश्वासन दिलें. स्टेशनपर्यंत पक्की सडक झाली तर त्यांनाही सोयीचें होणार होतें.

हें काम पावसाळ्यानंतर हातीं घेण्याचें ठरलें. दरम्यान सेवकरामनें सरकारशीं ह्या सडकेबाबत पत्रव्यवहार सुरू केला. त्यानें अशी मागणी केली कीं ही स्टेशनची सडक अगदीं पक्की करावी आणि त्यासाठीं लागणारी खडी वगैरे सरकारनें पुरवावी. वाफेचा रोलरही सरकारनें द्यावा. कारण कीं पक्की सडक केवळ लोकांच्या मेहनतीनें होणें शक्य नव्हतें. शिवाय ही सडक सरकारच्या मालकीची होणार होती. त्यामुळें त्यासाठीं लागणारा खर्च करणें हें सरकारचें कर्तव्यच होतें. ह्या कामासाठीं तो एक दोन वेळां मुंबईला जाऊन आला. त्याचें नांव मुंबईच्या सेक्रेटरिएटमध्येंही प्रसिद्ध होतें. राज्याच्या मुख्य मंत्र्यानें त्याचें म्हणणें ऐकून त्याला पाहिजे तें सामान देण्याचें कबूल केलें. मजुरीसाठीं एक पैचाही खर्च केल्याशिवाय पक्की सडक झाली तर त्यांत सरकारलाही फायदाच होता. सरकारी मदत पावसाळ्याच्या आंत मिळावी आणि ती धरणगांवच्या पतपेढीला सोंपवावी अशी विनंती त्यानें केली तीही मान्य झाली.

अद्याप पावसाळ्याला एखादा महिना बाकी होता. तेवढ्यांत श्रमयज्ञाच्या जोरावरच गांवांत दुसरी एक मोठी विहीर खोदावी असें लोकांनींच ठरवलें. सेवकराम मुंबईहून सरकारी मदतीचें आश्वासन घेऊन परत आला तेव्हां लोकांनीं त्याला स्वतःचा विचार सांगितला. सेवकरामनें ताबडतोब संमति दिली आणि विहिरीचें काम हातीं घेण्यांत आलें.

अशा प्रकारें श्रमयज्ञाच्या जोरावर लोकांच्या कायमच्या गैरसोयी दूर होऊं लागल्या. धरणगांवांत झपाट्यानें क्रांति होत होती. ह्या क्रान्तीकडे आसपासचीं सर्व गांवें कौतुकानें पाहात होतीं.

# ग्रामरक्षक दल ८.







धरणगांवांत एके काळीं भेरूमल्ल मारवाड्याचें फार मोठें प्रस्थ होतें. आसपासच्या पंचवीस खेड्यांत त्याची सावकारी धमधोकार चालत असे. त्याच्याजवळ लाखो रुपयांची रोकड असावी असें लोक म्हणत. त्याचा वाडा फार मजबूत होता आणि त्यांत एक गुप्त खोली असून तिच्यांत भेरूमल्ल स्वतःची रोकड ठेवतो असा लोकांचा समज होता. पण स्वातंत्र्यानंतर सावकारी कायदा आणि कूळकायदा ह्यांचा अंमल कडकपणानें सुरू झाल्यामुळें त्याची सावकारी अगदीं बसून गेली होती. अगदींच नाइलाज झाला म्हणजे लोक त्याच्याकडे जात आणि तो शंभराचे पंचाहत्तर रुपये देऊन शंभराचें खातें करवून घेत असे. पण सेवकरामची पतपेढी सुरू झाल्यापासून त्याचा धंदा अगदींच बसला

होता. त्याच्या मनांत सेवकरामविषयीं मोठी तेढ उत्पन्न झाली होती. पण काळाच्या प्रवाहापुढें त्याला नमतें घ्यावें लागलें होतें. धरणगांवांत चाललेल्या प्रगतीच्या कार्याबद्दल त्याला कसलाच उत्साह वाटत नव्हता, कारण कीं गांव सुखी झाल्यावर त्याला कोण विचारणार? म्हणून तो सेवकरामपासून दूर दूरच राहात असे.

गेले पंधरा दिवस भेरूमल्ल गांवांत नव्हता. बायका मुलांना घेऊन तो कोण्या नातेवाइकाच्या लग्नासाठीं जोधपूरला गेला होता. घराचा पक्का बंदोबस्त त्यानें केला होता. बंदुकीचा परवाना असलेला एक पठाण त्यानें चौकीदार म्हणून ठेवला होता. तो रात्रीं त्याच्या घराच्या आसपास खडा पहारा करीत असे.

भेरूमल्लच्या गैरहजेरींत एक भयंकर प्रकार घडला. त्याच्या वाड्याला अचानक दरोडेखोरांनीं घेरलें. पठाण बंदूक हातांत धरून पहारा करीत होता तेव्हां त्यानें समोरून कोणाला तरी येतांना पाहिलें. कोण आहे? असें विचारून तो त्याच्याकडे जाऊं लागला. इतक्यांत मागून दोघां माणसांनीं त्याला पकडून त्याची बंदूक हिसकावून घेतली आणि त्याच्या तोंडांत बोळा दिला. हें सर्व विजेच्या वेगानें झालें. मग दरोडेखोरांनीं स्वस्थपणानें भेरूमल्लच्या घराचें कुलूप तोडून आंत प्रवेश केला. पण त्यांच्या दुर्दैवानें आणि भेरूमल्लच्या सुदैवानें त्यांना तळघराचें दार सापडलें नाहीं. एवढ्यांत बाहेर हातपाय बांधून टाकलेल्या पठाणानें तोंडांतला बोळा काढून टाकून मोठ्यानें ओरडायला सुरुवात केली. त्याची ओरड ऐकून लोक जागे झाले आणि तिकडे धावले. दरम्यान दरोडेखोर जें कांहीं हातीं आलें तें घेऊन पळून गेले.

लोकांनीं येऊन पठाणाला सोडवलें. त्याची बंदूक गेली होती. लोकांनीं घरांत जाऊन पाहिलें तर सारें सामान अस्ताव्यस्त केलें होतें. चोरी किती मालाची झाली हें कोणालाच माहीत नव्हतें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं पठाणाकडून पत्ता घेऊन सेवकरामनें भेरूमल्लला तार केली कीं त्याच्या घरांत चोरी झाली आहे. पांचव्या दिवशीं भेरूमल्ल परतला आणि त्यानें साऱ्या वस्तु पाहून सांगितलें कीं पांच-सातशें रुपयांपेक्षां जास्त माल गेला नाहीं. हें ऐकून लोकांना समाधान वाटलें. ह्या प्रसंगानंतर मारवाड्यालाही वाटलें कीं गांवांत राहायचें तर गांवच्या लोकांशीं सहकार करूनच राहायला पाहिजे. म्हणून त्यानें चोरीच्या बाबतींत गंभीरपणानें सेवकरामशीं चर्चा केली.

ह्या चर्चेंतून असें निष्पन्न झालें कीं ह्या चोरीबद्दल पोलिसांना कळवणें हें कर्तव्य असल्यामुळें कळवावें. पण प्रत्येक खेड्याचें रक्षण करणें पोलिसांना अशक्य असल्यामुळें खेड्यांनीं स्वतःच्या रक्षणाची व्यवस्था स्वतःच केली पाहिजे. ह्यासाठीं धरणगांवांत एक ग्रामरक्षक दलाची स्थापना करावी, असेंही ठरलें. ह्यासाठीं येणारा सर्व खर्च मी देईन असें भेरूमल्लनें सांगितलें. कारण कीं चोर किंवा दरोडेखोरांना गांवांत येण्याचें प्रलोभन भेरूमल्लच्या गुप्तधनाचेंच होतें.

वाइटांतून चांगलें निघतें तें असें. लोभी मारवाड्याचा सहकार मिळाला ह्याचें सर्वांना आश्चर्य वाटलें. सेवकरामनें ह्या संधीचा चांगला फायदा घेतला. त्यानें ग्रामरक्षक दलाची सविस्तर योजना केली आणि सरकारी होमगार्ड्सच्या संस्थेशीं त्याला संलग्न करण्याचें ठरविलें. गांवांतले पंचवीस नवयुवक त्यानें तयार केले. सरकारशीं पत्रव्यवहार करून त्यानें लष्करी

शिक्षण देणारा एक शिक्षक मागवून घेतला. स्थानिक स्वयंसेवकांचा गणवेश वगैरेचा खर्च पेढीनें करायचा आणि होमगार्ड्सच्या ह्या शाखेच्या अधिकाऱ्याचा खर्च सरकारनें करायचा अशी व्यवस्था केली. खेड्यांत होमगार्ड्सची शाखा व्यवस्थित रीतीनें स्थापली गेल्याचें हें पहिलेंच उदाहरण होतें.

होमगार्ड्सच्या स्थापनेनंतर लोकांना एक प्रकारची निश्चितता वाटूं लागली. भेरूमलला तर अगदीं आनंद झाला. गांवांत रात्रींची गस्त सुरू करण्यांत आली. तीन तीन तासांच्या दोन पाळ्या ठरवून रात्रीं अकरा ते पहाटे पांचपर्यंत दररोज गस्त होऊं लागली.

अशा रीतीनें गांव सुरक्षित झालें. ह्या प्रसंगानें सेवकराम आणि भेरूमल ह्यांच्यामधली तेढही नाहींशी झाली आणि सेवकरामच्या कार्य-सिद्धीला वेग मिळाला.

## तुळसीचें ९. प्रत्यागमन



एक वर्षाचें शिक्षण आणि एक वर्षाचा प्रत्यक्ष हॉस्पिटल-मधला अनुभव पुरा करून तुळसी एक निष्णात नर्स होऊन धरणगांवला परतली. गांवलोकांनीं तिचें उत्साहानें स्वागत केलें. आतां ती पूर्वीची तुळसी राहिली नव्हती. तिच्यांत पुष्कळच फरक झाला होता. बुजरेपणा जाऊन निर्भयता आली होती. असहायता जाऊन आत्मविश्वास आला होता.

सेवकरामनें रात्रींच्या प्रार्थनासभेंत तुळसीचा गौरव केला आणि स्वतः काय काय शिकली तें लोकांना सांगायला सांगितलें. तुळसी प्रथम लाजली, पण नंतर निर्भयपणानें तिनें स्वतःचे शिक्षणकाळांतले अनुभव सांगितले. कस्तुरबा ट्रस्ट किती उत्तम काम करीत आहे, हेंही तिनें सांगितलें. खेड्यांतली ही रडत बसणारी मुलगी प्रार्थनेंत इतक्या

निर्भयतेनें इतकें सुंदर व्याख्यान देऊं शकते, हें पाहून लोकांना आश्चर्य वाटलें. सेवकरामनें लोकांना समजून सांगितलें कीं हा शिक्षणाचा परिणाम आहे, म्हणून प्रत्येकानें शिक्षण घेतलें पाहिजे. कमींत कमी लिहावाचायला तरी शिकलेंच पाहिजे.

धरणगांव शिक्षणांत तसा बराच पुढारलेला होता. तशांत गेलीं तीन चार वर्षें सेवकरामनेंही शिक्षणाचें प्रमाण वाढविलें होतें. आतां गांवांत निरक्षर लोकांची संख्या फार तर शंभराची होती. तुळसी परत आली तेव्हां तिला हें काम सोंपवावें असें सेवकरामनें ठरविलें. तुळसीनेंही तें मान्य केलें. तुळसीनें साक्षरतेचे वर्ग चालवावे आणि त्याबरोबरच प्रसंग येईल तेव्हां गांवांतलीं बाळंतपणें करावीं, असें दुहेरी काम तिला सोंपविण्यांत आलें. त्यासाठीं तिला बाळंतपणाचीं आवश्यक उपकरणें दिलीं. आणून बाळंतपणासाठीं एक लहानसा दवाखानाच थाटला गेला. गांव मोठा असल्यानें महिन्यांतून ४।५ तरी बाळंतपणाच्या केसी यायच्याच. त्या सर्वांचें बाळंतपण ह्या दवाखान्यांतच केलें जाई. बाळंतिणींसाठीं दोन खाटा ठेवण्यांत आल्या होत्या. तुळसीच्या मदतीला एक बाई दिली होती. ती दवाखान्याची साफसफाई आणि बाळंतिणींची चाकरी करीत असे.

साक्षरतेसाठीं तुळसीनें मुख्य मुख्य ठिकाणीं चार वर्ग उघडले. ह्या वर्गांत ती दररोज ५।६ तास काम करीत असे. बाळंतपण आलेंच तर तेवढ्यापुरता वर्ग बंद राही. बाकी सर्व वेळ हा वर्ग चालू असे. तुळसीनें नर्सिंगच्या शिक्षणाबरोबरच इतर वाचनही पुष्कळ केलें असल्यामुळें तिचें भाषेचें ज्ञान चांगलेंच वाढलें होतें. त्यामुळें साक्षरतेच्या वर्गांत तिला कसलीच अडचण भासली नाहीं.

अशा रीतीनें तुळसीचें काम व्यवस्थित चालू असतांना एके दिवशीं तिच्या साक्षरता वर्गाची एक विद्यार्थिनी रक्तबंबाळ होऊन रडत रडत वर्गांत आली. ती रघु सोनाराची बायको मंजुळा होती. तिच्या डोक्यांतून रक्त वाहात होतें. तुळसीनें वर्गाचें काम बंद ठेवून अगोदर तिच्या डोक्यावरील जखमेकडे लक्ष दिलें. जखम फारशी खोल नव्हती त्यामुळें काळजी करण्यासारखें कांहींच नव्हतें. तुळसीनें जखम धुवून औषध लावलें आणि पट्टा बांधला. आतां मंजुळेचें रडें थांबलें होतें. डोक्याला जखम कशी झाली, असें तुळसीनें विचारलें तेव्हां मंजुळा पुन्हा रडूं लागली. तिनें रडत रडतच सांगितलें कीं तिच्या नवऱ्यानें दारूच्या धुंदींत तिला मारलें. हें ऐकून तुळसीला फार वाईट वाटलें. तिनें मंजुळाची समजूत घालून तिला घरीं पाठविलें.

पण रघु सोनाराला दारू कोठून मिळाली ? धरणगांव एक आदर्श गांव आहे अशी त्याची चहूंकडे ख्याति असतांना धरणगांवांत दारू मिळूं शकते, हें कसें काय ? हा प्रश्न तुळसीच्या मनांत उद्भवला. पण तिला त्या बाबतींत कांहींच करतां येण्यासारखें नसल्यामुळें तिनें घडलेला प्रकार सेवकरामला कळवला.

सेवकरामला आश्चर्याचा मोठा धक्का बसला. सरकारनें दारूबंदी केल्यापासून लोकांचा चांगलाच फायदा झाला होता. चोरूनमारून दारू पिणारे लोक चहूंकडे होते. पण ते अपवादरूप. पण दारूबंदी सर्व-साधारण लोकांना आशीर्वादरूप होती. सेवकरामला रघु सोनार दारू पितो ह्याचें फारसें दुःख झालें नाहीं. पण धरणगांवांत दारू येऊं शकते ह्याचें त्याला फार आश्चर्य वाटलें. गांवांत रात्रंदिवस जागृति असतांना हें

कसें होऊं शकलें ? रात्रींसुद्धा गांवांत पहारा असतो. मग ही दारू कोठून आली ? कीं धरणगांवांतच ही दारू तयार होते ?

सेवकराम तावडतोब रघु सोनाराच्या घरीं गेला. ह्या वेळीं रघु सोनार नेहमींप्रमाणें आपलें काम करीत होता. सेवकरामला पाहून तो उठून उभा राहिला आणि त्यानें नमस्कार केला.


सेवकराम खालीं बसला नाहीं. त्यानें उभ्या उभ्याच रघूला स्वतःबरोबर यायला सांगितलें. त्याला बाहेर घेऊन गेल्यावर त्यानें अगदीं गोडपणानें त्याला विश्वासांत घेतलें आणि तो दारू कोठून मिळवितो तें त्याला विचारलें.

रघूला सेवकरामजवळ खोटें बोलणें शक्य झालें नाहीं. त्यानें सांगितलें कीं धरणगांवाहून तीन मैलांवर नदीकांठीं दुर्गेश्वर महादेवाचें देऊळ आहे. त्या देवळांत दारू गाळली जाते आणि तेथें जाऊन लोक दारू पितात. धरणगांवांत दुसरे कोण कोण दारू पितात ? असा प्रश्न सेवकरामनें विचारला तेव्हां रघूनें लखू लोहार, सदा कुंभार, रामू धनगर हीं तीन नांवें दिलीं. ह्यावर सेवकरामनें रघूचे आभार मानले आणि पुन्हा दारू न पिण्याबद्दल त्याला ताकीद देऊन तो परत स्वतःच्या मुक्कामावर आला.

ह्यानंतर सेवकराम जिल्ह्याच्या गांवीं जाऊन कलेक्टरला भेटला आणि धरणगांवच्या शुद्ध जीवनांत विष कालविणाऱ्या ह्या चोरट्या दारूचा नायनाट करण्याची विनंती त्यानें केली. सरकारनें तावडतोब चोरट्या दारूचीं ठिकाणें शोधून काढून त्यांचें निर्मूलन केलें आणि धरणगांवला भयमुक्त केलें.

## धरणगांवचा निरोप

१०.



येत्या जानेवारीच्या ३० तारखेला धरणगांव सोडून स्वतः भूदानयज्ञाच्या कार्यासाठीं महाराष्ट्राची यात्रा करायला निघणार असें सेवकरामनें जेव्हां प्रार्थनासभेंत जाहीर केलें, तेव्हां धरणगांवच्या लोकांना फार दुःख झालें. त्यांनीं सेवकरामला गांव सोडून न जाण्याची विनंती केली. पण भूदानयज्ञाचें कार्य किती महत्त्वाचें आहे हें जेव्हां सेवकरामनें त्यांच्यापुढें मांडलें तेव्हां लोकांना कांहींच बोलतां येईना.

सेवकरामचें धरणगांवांतलें कार्य जवळ जवळ संपलें होतें. पतपेढी जोरांत होती. सामुदायिक शेतीचा प्रयोग सफळ होऊन सबंध जिल्ह्यांत जास्तींत जास्त एकरी पीक काढण्याबद्दलचें सरकारी इनाम धरणगांवला मिळालें होतें. हें बक्षीस देण्याचा समारंभ धरणगांवलाच व्हावा

आणि त्यासाठीं मुख्य प्रधानाला बोलवावें अशी विनंती सेवकरामनें कलेक्टरला केली. त्याप्रमाणें सर्व कांहीं नक्की झालें. ३० जानेवारी १९५४ रोजीं गांधीश्राद्धदिनाचा मोठा उत्सव करण्याचें धरणगांवनें ठरवलें होतें. त्याच दिवशीं हा बक्षीससमारंभ व्हावा असें ठरलें. त्याच दिवशीं सेवकरामही भूदानयज्ञासाठीं गांव सोडून जाणार होता. त्याच दिवशीं आणखीही एक समारंभ योजला होता. भेरूमल्लनें गांवांत बाळंतपणाचें हॉस्पिटल बांधून दिलें होतें आणि त्या हॉस्पिटलमध्यें दहा बाळंतिणींची सोय केली होती. बाळंतपणाची सर्व सामुग्री विकत आणली होती. ह्या हॉस्पिटलचें उद्‌घाटन तुळसीचा पति डॉ. विश्वासराव ह्यांच्या हस्तें करण्याचें सेवकरामनें ठरवलें. पण त्यानें हें गांवांत कोणालाच सांगितलें नाहीं.

शेवटीं ३० जानेवारी १९५४ चा दिवस उगवला. तीन्ही उत्सवांची तयारी केली होती. मोठा मांडव बांधला होता. गांवांत चहूंकडे ध्वजातोरणें लावलीं होतीं. भारताचा राष्ट्रध्वज गौरवानें मंडपावर डोलत होता. कलेक्टर आले, निमंत्रित पाहुणे आले. अध्यक्ष म्हणून मुख्य प्रधानही आले. ग्रामरक्षकदलाच्या सैनिकांनीं लष्करी सलामी दिली आणि मग समारंभाला सुरुवात झाली.

प्रथम शेतीबद्दलचें बक्षीस देण्याचा समारंभ झाला. सेवकरामनें धरणगांवच्या पंचवार्षिक कार्याचा अहवाल सांगितला. कलेक्टरनें धरणगांवची मुक्तकंठानें प्रशंसा केली. मुख्य प्रधानानें धरणगांवचें अभिनंदन करून सेवकरामचा गौरव केला. नंतर इनाम दिलें गेलें आणि पहिला समारंभ संपला. सरकारी माणसें आणि बाहेरचे पाहुणे परतले.

ह्यानंतर दुपारीं चार वाजतां हॉस्पिटलचें उद्घाटन झालें. डॉ. विश्वासराव आले होते. तुळसीनें त्याला ओळखलें नाहीं आणि विश्वासरावानेंही तुळसीला ओळखलें नाहीं. गांवलोकांनाही उद्घाटना-साठीं कोण पाहुणे आले आहेत तें माहीत नव्हतें. तुळसीनें विश्वासरावांना बरोबर घेऊन सगळें हॉस्पिटल दाखविलें. विश्वासरावांनीं अनेक प्रश्न विचारून तुळसीची परीक्षा घेतली. तिचें ज्ञान आणि तिची शालीनता पाहून विश्वासराव खुश झाले. त्यांनीं सेवकरामकडे तुळसीला स्वतःच्या हॉस्पिटलमध्यें थोडे दिवस पाठविण्याचा आग्रह केला. सेवकरामनें अर्थातच आनंदानें संमति दिली.

नंतर उद्घाटन झालें. प्रारंभिक भाषणांत सेवकरामनें विश्वासरावाचा परिचय करवला. त्यांचें नांव ऐकतांच सर्व लोक आश्चर्यानें पाहूं लागले. काशीनाथच्या जावयाला पाहून लोकांना आश्चर्य वाटलें. पुढें सेवकरामनें तुळसी विश्वासरावांच्या हॉस्पिटलमध्यें अनुभव घ्यायला जाणार आहे असेंही सांगितलें आणि मग हळूच तो म्हणाला, "हा योगायोग किती विचित्र आहे. डॉ. विश्वासरावांनीं दहा वर्षांपूर्वीं ज्या स्वतःच्या पत्नीचा ती अशिक्षित आहे म्हणून त्याग केला, तिचीच मागणी ते आज स्वतःच्या हॉस्पिटलसाठीं करीत आहेत."

हें ऐकून विश्वासराव अगदीं निस्तब्ध झाला. बिचारी तुळसी विश्वासरावाच्या जवळच खुर्चीवर बसली होती ती लाजून पळून गेली. विश्वासरावाला आतां उद्घाटनाचें भाषण करायचें होतें. तें भाषण त्याच्या अंतःकरणाच्या भावनांचा ओघ होता. तुळसीसारख्या रत्नाचा त्याग केल्याबद्दल त्यानें लोकांची माफी मागितली. हा योगायोग रचण्याबद्दल

सेवकरामचे आभार मानले आणि हॉस्पिटलचें उद्घाटन जाहीर करून स्वतः हॉस्पिटलला दहा हजारांची देणगी दिल्याचें जाहीर केलें.

सर्वत्र आनंदी आनंद झाला. बाळंतपणाच्या हॉस्पिटलची जबाबदारी विश्वासरावनें घेतली. तुळसीला तिचा पति परत मिळाला. संध्याकाळीं काशीनाथच्या घरीं जावयाला थाटाची मेजवानी झाली. रात्रीं प्रार्थनासभा झाली. त्या सभेंत सेवकरामनें स्वतःचें सारें हृद्गत ओतलें. त्यानें गांवाचा निरोप मागितला त्या वेळीं त्याला दुःख आवरेना. गळा भरून आला. अश्रु वाहूं लागले. सारी सभा रडूं लागली.

त्या रात्रीं धरणगांवांत कोणालाच झोप आली नाहीं. दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं धरणगांवांतून दोन व्यक्तींनीं प्रयाण केलें. एक पतिगृहीं जाणारी तुळसी आणि दुसरा धरणगांवचा मूकसेवक सेवकराम.

सेवकराम जसा आला तसा गेला. तो कोण होता, कोठून आला, कोणालाच कळलें नाहीं. तो शरीरानें गांव सोडून गेला तरी त्याचा आत्मा धरणगांवांतच राहिला. त्याच्या जीवनाच्या सुगंधानें धरणगांवचें जीवन भरलें होतें. तो सुगंध धरणगांवांत कायमचा राहो.

BVBK-0404596

वाचनालय

# धरणगांवच्या धर्मशाळेंतला धर्मात्मा

विचित्र तर खराच. पण त्यानें धरणगांवांत विलक्षण क्रान्ति घडवून आणली. खऱ्या जीवनाचा सुमधुर सुगंध त्यानें धरणगांवांत दरवळून टाकला ....

सेवकराम बोले थोडें .... करी फार. त्याची सेवा मुकी होती पण तिनें गांव बोलका केला. भारतांतला प्रत्येक गांव असा बोलका व्हावा, असें तुम्हांला वाटतें ना ? मग ....



**खूप वाचा**
**खूप शिका**

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई